रे.मु.क्र.७५९/२०२२
नि.१८ लगत जोड.

**<u>वादीतर्फे सा.क्र.१ यांचा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.वाय.बी. पाटील यांच्यामार्फतः</u>**

हे म्हणणे खरे आहे की माझ्या दाव्यात एकत्र कुटुंबाची वंशावळ मी नमुद केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकत गट नं.४६ सोडुन इतर सर्व मिळकती वडीलोपार्जीत आहेत व दावा मिळकत ही खरेदीची आहे. हे म्हणणे खरे आहे की कोणत्या मिळकती वडीलोपार्जीत आहेत त्यांचे मिळकत नंबर या दाव्यात नमुद केलेले नाहीत. मला दत्तात्रय रामभाऊ नवले, दादाभाऊ रामभाऊ नवले असे दोन भाऊ आहेत. मला बहीणी नाहीत. हे म्हणणे खरे आहे की दत्तात्रय नवले याने माझ्याविरुध्द कोर्टात रे.मु.नं.३६२/२००१ दावा दाखल केला होता व त्यामध्ये आमच्या एकत्र कुटुंबात तडजोड होवुन योग्य व कायदेशीर वाटप झाले होते व त्या वाटपाप्रमाणे जो तो वहिवाट करत आहे. हे म्हणणे खरे आहे की ग्रामपंचायत मिळकत क्र.२२९ व २३२ या आमच्या एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातुन खरेदी केल्या होत्या. त्यामध्ये आमच्या सगळयांचेच हिस्से होते. हे म्हणणे खरे आहे की ग्रामपंचायत मिळकत क्र.२२९ व २३२ या माझ्या एकटयाच्या नावे आहेत. मी सांगतो की त्या माझ्या खरेदी केलेल्या मिळकती आहेत. हे म्हणणे खरे आहे की त्या मिळकतींमध्ये मी माझ्या भावांना हिस्सा दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की रे.मु.नं. ३६२/२००१ मधील वाटपानंतर पुन्हा आमच्यामध्ये एकत्र कुटुंबाच्या जमिनींमध्ये वाटप झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की आमच्या एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातुन वाघुंडे येथील मिळकत खरेदी केली होती. मी सांगतो की मी ती माझ्या नोकरीच्या पैश्यातुन खरेदी केली होती. हे म्हणणे खरे नाही की वाघुंडे येथील मिळकत एकत्र कुटुंबाची होती व त्यामध्ये आम्हा तिघा भावांचा हिस्सा होता. हे म्हणणे खरे आहे की ती जमिन मी एकटयाने बन्सी दिवटे यांना विक्री केली होती. हे म्हणणे खरे आहे की त्या विक्रीतुन आलेली रक्कम मी माझ्या भावांना दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की त्या विक्रीतुन आलेली रक्कम मी माझ्या भावांना न दिल्याने त्या बदल्यात मी रे.मु.नं.३६२/२००१ मध्ये दावा मिळकतीमधील अर्धा हिस्सा माझ्या भावांना दिला

होता. हे म्हणणे खरे नाही की रे.मु.नं.३६२/२००१ मध्ये गट नं.४६ चे केवळ ३८ आर क्षेत्र नमुद केले होते. हे म्हणणे खरे नाही की गट नं.४६ मधील ३८ आर क्षेत्रापैकी १९ आर क्षेत्र मी घेतले व उर्वरीत १९ आर क्षेत्र साहेबराव नवले यांना वाटुन दिले. हे म्हणणे खरे आहे की रे.मु.नं.३६२/२००१ च्या तडजोड हुकुमनाम्याविरुध्द मी अपील दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की रे.मु.नं.३६२/२००१ मधील हुकुमनाम्याप्रमाणे गावदप्तरी नोंद झाली होती.

प्रश्न- रे.मु.नं.३६२/२००१ मधील हुकुमनाम्याप्रमाणे झालेल्या नोंदींबाबत तुम्हाला सुरुवाती पासुन माहीती होती का?

उत्तर- नाही. भावाने सांगितल्यानंतर मला त्या नोंदीबाबत कळाले.

हे म्हणणे खरे आहे की माझ्या दाव्यात मी त्या नोंदींबाबत माझ्या भावाने मला सांगितल्यानंतर कळाल्याचे नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रांताकडे दाखल केलेला आमचा उशीर माफीचा अर्ज नामंजुर झाला होता. हे म्हणणे खरे आहे की मी त्या उशीर माफीच्या अर्जाविरुध्द केलेले अपील कलेक्टरने नामंजुर केले. हे म्हणणे खरे आहे की सदर अर्जाचे प्रकरण प्रांतकडुन तहसिलदारकडे पाठवल्यानंतर तहसिलदाराने सांगितले होते की सदर नोंद ही कोर्टाच्या आदेशाप्रमाणे झालेली असुन ती नोंद आम्हाला रद्द करता येणार नाही व त्यामुळे फेरचौकशी अर्ज नामंजुर करण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की त्याविरुध्द प्रांत अधिकारी यांचेकडे अपील केल्यावर त्याचा निकाल माझ्याविरुध्द लागला व त्याविरोधात जिल्हाधिकारीकडे अपील केल्यावर त्याचाही निकाल माझ्याविरुध्द लागला. हे म्हणणे खरे आहे की कलेक्टरच्या निकालाविरुध्द मी अपील केलेले नाही.

प्रश्न- गट नं.४६ मध्ये ३८ आर क्षेत्रावर आजरोजी तुमचे नाव नाही?

उत्तर- माझे नाव नाही आहे मात्र मी ती जमिन आज रोजीही कसत आहे.

प्रश्न- तुमच्या नावावर जेवढी जमिन आहे तेवढीच जमिन तुमच्या ताब्यात आहे?

उत्तर- माझ्या ताब्यात ३८ आर क्षेत्राची जमिन आहे.

प्रश्न- प्रतिवादीच्या नावावर जेवढे क्षेत्र आहे तेवढे क्षेत्र त्याच्या ताब्यात आहे?

उत्तर- प्रतिवादीच्या ताब्यात ३८ आर क्षेत्र आहे व माझ्या ताब्यात ३८ आर क्षेत्र

आहे.

प्रश्न- तुमच्या नावावरील क्षेत्रावर प्रतिवादीने कधीही अतिक्रमण करण्याचा किंवा ताबा घेण्याचा प्रयत्न केला नव्हता?

उत्तर- ताबा घेण्याचा प्रयत्न केला होता.

हे म्हणणे खरे नाही की दावामिळकत ही प्रतिवादीची मालकी वहिवाटीची असताना केवळ दावामिळकत मला मिळावी या गैरउद्देशाने मी हा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की सदर दावा मिळकत प्रतिवादीस खरेदीखताने व कोर्टातुन वाटपाने आलेली असल्याने माझा दावा मिळकतीशी काही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

NILESH SHRIPAL SABNIS Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS Date: 2025.11.24 17:51:40 +0530

दिनांक : २४/११/२०२५

( डॉ.एन.एस.सबनीस )

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर

पारनेर